# मन कसं कळणार?

श्रीमद् नामचैतन्य भानुदास
दि. ०३–०२–२००९
दैनिक सकाळ, मुंबई यांच्या सौजन्याने

मन कसं आहे? कुठे आहे? याचा विचार करायचा झाला तर सर्वप्रथम मन काय आहे हे समजणं नितांत गरजेचं आहे. आज आधुनिक वैद्यक शास्त्राचे वैज्ञानिक मेंदूची जास्तीतजास्त उकल करण्यात गढले आहेत. खरंतर मेंदूच्या कार्यपद्धतीचं अत्यल्प ज्ञान आपल्याला झालं आहे.मेंदूच्या कार्यप्रणालीवर मनाच्या भाव भावनांचा बऱ्याच प्रमाणात प्रभाव असतो.मनावर संशोधन करायचं झालं तर केवळ बहिर्मनाचा (कॉन्शस माईंडचा) मेंदूशी सतत संपर्क असतो. म्हणून मेंदूमध्येच मन असतं किंवा मेंदू म्हणजेच मन असं मानणं चुकीचं ठरेल. म्हणूनच ज्या ज्या भौतिक आणि आध्यात्मिक शाखांचा मनाशी संपर्क येतो त्या सर्व शाखांचाही विचार करणं आवश्यक ठरेल. वनस्पतीत जीव असतो, याविषयी भौतिक विज्ञान पूर्णत: अनभिज्ञ होतं. गेल्याच शतकात भारतीय वैज्ञानिक जगदीशचंद्र बोस यांनी ‘वनस्पतीत जीव असतो’ हे सप्रयोग सिद्ध केलं, त्याचबरोबर वनस्पतीला मन असतं हेही सिद्ध केलं. अनेक वैज्ञानिक आणि सामान्य व्यक्तींनी प्रयोग करून वनस्पतींना मन असतं हे मान्य केलं आहे. वनस्पतींना मेंदू असतो हे मला तरी ज्ञात नाही. ‘संमोहन शास्त्र’ हे पूर्णत: मनाशी निगडित आहे. आधुनिक संमोहन शास्त्र बऱ्याच प्रमाणात प्रगत झालं आहे. संमोहन करणारा संमोहित होणाऱ्याच्या बहिर्मनाला (कॉन्शस माईंडला) आज्ञा देऊन त्याला संमोहित करतो. त्यानंतर अंर्तमनावर (सबकॉन्शस माईंडवर) ताबा मिळवून, तो संमाहिताच्या अंत:करणापर्यंत (सुप्राकॉन्शस माईंडपर्यंत) पोहोचतो. संमोहन शास्त्रज्ञांनी अंत:करणापर्यंत पोहोचून संमोहिताच्या गत जन्मीच्या नोंदी लिहून ठेवल्या आहेत. या जन्मी संमोहिताला ज्ञात नसलेली ठिकाणं, ज्ञात नसलेल्या घटना आणि व्यक्ती जेव्हा त्याने संमोहित अवस्थेत सांगितल्या, त्या पडताळून पाहिल्या गेल्या. ती ठिकाणं शोधल्यानंतर संमोहिताने सांगितलेल्या घटना त्या ठिकाणी फार पूर्वी घडून गेल्याचं निदर्शनास आलं. अध्यात्म–विज्ञानाच्या मते बहिर्मनावर होणारा तीव्र आघात अंतर्मनातून अंत:करणापर्यंत पोहोचतो किंवा एखादा अतितीव्र आघात सरळ अंत:करणावर पोहोचतो. देह सोडताक्षणीच बहिर्मन इथेच विरतं. केंद्रस्थ असलेल्या आत्म्याला घेऊन अंत:करण देहातून बाहेर पडतं. याच सदरात मृत्यूनंतरच्या जीवनाविषयी आपण थोडक्यात पाहाणार आहोत.